# शिक्षण विभाग(माध्यमिक) जिल्हा परिषद, बुलडाणा

कार्यालय जयस्तंभ चौक, बुलडाणा, ४४३००१

E-Mail - eosecondaryzpbuldhana@gmail.com दुरध्वनी क्रमांक ०७२६२ २४१०२२

जा.क्र.बुजिप/शिमा/ /११० /२०१८ दिनांक -०५/०१/२०१८

प्रति,
गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती---- (सर्व)

**विषय:** तालुकास्तरिय एक दिवसीय उजळणी वर्ग आयोजना बाबत.

**संदर्भ:**

१.शिक्षण संचालक,शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) पत्र क्रमांक/संकीर्ण-२०१७/(१८८७६/१७)/१५क(३०५)/७६७२ दिनांक- २/११/२०१७.

२.दि.१३ व दि.१४ नोव्हेंबर २०१७ राज्यस्तरीय खडवली, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील बैठकीत दिलेल्या सुचना.

वरील संदर्भीय परिपत्रकानुसार आपल्या जिल्हयामध्ये विपश्यना आनापान साधनेतंर्गत मित्र उपक्रमाच्या प्रभावी प्रभावीपणे अंमलबजावणी करणेच्या दृष्टीने आपल्या तालुक्यांतर्गत तालुकास्तरीय मित्र उपक्रमांनगत आनापान परिचय शिबीराचे आयोजन दि. / २०१८ ला ११.०० ते ४.३० या वेळेत आपल्या स्तरावर आयोजित करावयाचे आहे. त्या करिता खालील बाबींची पूर्तता करण्यात यावी.

- सदर उपक्रम सर्व माध्यमाच्या आणि सर्व व्यवस्थापनाच्या इयत्ता ५ वी ते १० वीचे वर्ग असणाऱ्या प्रत्येक शाळेतील विद्यार्थ्यांना शिक्षकांमार्फत आनापान सराव देण्याकरिता आवश्यक आहे.
- प्रत्येक शाळेतील इयत्ता ५वी ते १० वीला शिकविणाऱ्या शिक्षकांपैकी किमान एक शिक्षक हजर ठेवावा.
- प्रत्येक शाळेचा एक प्रतिनिधी व्यवस्थित बसेल याप्रमाणे प्रशस्त बैठक व्यवस्था करावी.
- LCD projecter, CD players, Laptop ,लाऊड स्पीकर,माईकची व्यवस्था करण्यात यावी.
- शिबीरामध्ये विपश्यना झालेल्या शिक्षकांना किंवा मुख्याध्यापक किंवा सदर उपक्रमांची चांगल्या प्रकारे अंमलबजावणी करण्यास सक्षम शिक्षकाला पाठविण्यात यावे.
- एकही शाळा या शिबीरात सहभागाविना राहणार नाही या करिता योग्य नियोजन करावे.

Balwe
(डॉ.श्रीराम पानझाडे)
सदस्य सचिव मित्र उपक्रम जिल्हा समिती तथा
शिक्षणाधिकारी ( माध्य) ,
जि.प. बुलडाणा.

प्रतिलिपी -. मा. प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, बुलडाणा यांना माहितीस्तव सविनय सादर.